## ट्रिपल सीट, रॉंग साइड जाणाऱ्या वाहनांवर कारवाई

**अमरावती** – शहरात वाहतूक नियमांचे उल्लंघन होत असल्याने वाहतूक विभागाने कारवाई तीव्र केली आहे. रविवारी शहरातील पंचवटी चौकात ट्रिपल सीट चालवणाऱ्या आणि रॉंग साइड वाहने चालवणाऱ्यांची एकूण 16 वाहने जप्त करण्यात आली. त्यानंतर सायंकाळी नागपुरीगेट पोलिस ठाण्यासमोरील चौकात वाहतूक पोलिस कारवाईसाठी सज्ज झाले होते. पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी शनिवारी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना ट्रिपल सीट आणि निष्काळजीपणाने वाहने चालविणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. ट्रिपल सीट वाहन पकडल्यास तीन महिने वाहन सोडायचे नाही, अशा नोटीसही दिली होती. त्याअंतर्गत रविवारी सकाळपासूनच वाहतूक विभागाने शहरातील विविध चौकात कारवाई सुरू केली. पंचवटी चौकात अनेक वाहनचालकांच्या वाहनांची कागदपत्रे, परवाने व इतर कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. याशिवाय ट्रिपल सीट चालवून नियम मोडणाऱ्या चालकांची 16 वाहने जप्त करण्यात आली आहेत. जप्त केलेली सर्व वाहने वाहतूक विभागात जमा करण्यात आली आहेत. वरील कारवाई वाहतूक विभागाच्या पोलीस निरीक्षक ज्योती विल्लेकर व इतर वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांनी केली. त्यानंतर सायंकाळी नागपुरीगेट पोलिस ठाण्याच्या हद्दीतील चौकात वाहतूक पोलिस विभागाने कारवाई सुरू केली.

# ...तर उध्दव साहेब सांगतील त्यांचा प्रचार मी करेल!

## ■ उमेदवारी मागण्याचा प्रत्येकाला अधिकारी आहे ■ प्रिती बंड यांची 'दै.महासागर' ला खास मुलाखत



*महासागर प्रतिनिधी*

*अमरावती,( दि.20 )–पक्षात निष्ठेने काम करणाऱ्या प्रत्येकाला उमेदवारी मागण्याचा अधिकार आहे. इतरांप्रमाणे मी सुध्दा उमेदवारी मागत आहे. मला शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे उमेदवारी देतील असा विश्वास आहे. मला उमेदवारी न मिळाल्यास ज्यांना उमेदवारी मिळेल आणि उध्दव साहेब सांगतील त्यांचा प्रचार मी करेल, असे शिवसेना ( उबाठा ) महिला जिल्हा संघटीका तथा बडनेरा मतदार संघातील इच्छुक उमेदवार प्रिती संजय बंड यांनी 'दैनिक महासागर' ला दिलेल्या एका खास मुलाखतीदरम्यान स्पष्ट केले. विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमिवर विचारलेल्या अनेक प्रश्नांची त्यांनी दिलखुलास उत्तरे दिली.*

**प्रश्न – तुम्हाला बडनेरा मतदारसंघात उमेदवारी मिळण्याची किती शक्यता आहे?**

**बंड–** मला उमेदवारी मिळण्याची शक्यता नाही, तर उध्दव ठाकरेंवर विश्वास आहे. परंतू उमेदवारी मिळाली नाही, तरिही उध्दव ठाकरें म्हणतील त्या उमेदवाराचा प्रचार करेल.

**प्रश्न–तुम्हाला तिवसा मतदार संघातून लढण्याची ऑफर होती का?**

**बंड** – कुणी ऑफर द्यावी, ती मी स्विकारावी असे नसते. मी प्रिती बंड म्हणून निवडणूक लढवित नसून संजय बंड यांची पत्नी म्हणून निवडणूक लढवित आहे. संजय बंड हे तिवसा मतदारसंघात 25 हजार मतांनी पराभूत झाले होते, आणि बडनेरा मतदारसंघात फक्त 2500 मतांनी. बडनेरा मतदार संघ काबीज करणे स्व.संजय बंड यांचे स्वप्न होते, ते मला पुर्ण करायचे आहे. त्यामूळे मी बडनेरा मतदार संघ निवडला.

**प्रश्न–निवडणूकीमध्ये काय–काय आव्हाने असतील?**

**बंड–** गेल्या निवडणूकीमध्ये फक्त अवघ्या चार महिन्याच्या कालावधीत मी निवडणूकीला सामोरे गेली होती. परंतू यंदा लोकसभेच्या प्रचारादरम्यान मला परिस्थिती पाच वर्षात बदललेली दिसत आहे. युती तुटल्याने आणि पक्ष फुटल्याने कालपर्यंत जे आपल्या सोबत होते, ते ही प्रतिस्पर्धी म्हणून राहणार आहे. अनेकांची मनधरणी करावीच लागणार आहे, कारण त्यांच्या विना निवडणूक लढविणे खूप जिकरीचे होईल. सोबतच भौतिक आणि आर्थिक आव्हानांचाही सामना करावा लागणार आहे.

**प्रश्न–आरोप आहे की, तुम्ही निवडणूकीच्या तोंडावर प्रचाराला लागता?**

**बंड–** हा चुकीचा आरोप आहे, असे असते तर दोन वर्षांपुर्वी झालेल्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकीमध्ये आमचे बडनेरा मतदारसंघातील 4 संचालक निवडूण आले असते का?, तीन वर्षांपुर्वी झालेल्या जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणूकीमध्येही मी सक्रीय होती. सहकारच्या निवडणूका खूप कठीण असतात. खूप लोकांच्या भेटी घ्याव्या लागतात. मी घरी बसून असती तर आम्हाला यश मिळाले असते का?, नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणूकीतही मी अमरावती व बडनेरा मतदारसंघ पिंजून काढला. असे असताना हा निवडणूकीच्या तोंडावर प्रचार कसा म्हणता येईल.

**प्रश्न–निवडणूकीत लढतांना अजेंडा काय असेल?**

**बंड–** बडनेरा मतदारसंघात सर्वात मोठा प्रश्न बेरोजगारीचा आहे. ज्यामूळे शहरात गुन्हेगारी बोकाळली आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात हत्यांची शृंखला पहायला मिळत आहे. दवाखाने नाहीत, एकाच घरी आमदार, खासदार असताना उद्योगधंदे स्वतःच्या घश्यात घातल्याशिवाय दुसरे कोणतेच काम केले नाही. शासकीय मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल नाही, रस्ते नाहीत, आतापर्यंत शासकिय वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीच्या बांधकामाला सुरुवात झालेली नाही. या मतदारसंघात लोकसेवक नाही, तर व्यापारी राज करतात, या व्यापाऱ्यांना घरी बसवून लोकसेवक म्हणून काम करायचे आहे.

**प्रश्न – कालपर्यंत जे तुमच्या सोबत होते ते आज विरोधात आहेत?**

**बंड–**एखाद्या शिवसैनिकाने उमेदवारी मागितली तर तो निष्ठावंत नाही, असे म्हणून चालणार नाही. उमेदवारी मागण्याचा अधिकार सर्वांना आहे. ज्यांना उमेदवारी मिळेल त्यांच्या पाठीशी उभे राहणे हे निष्ठावंतांचे काम आहे. मी ही तेच करेल, आणि जे आज माझ्या विरोधात आहेत, ते सुध्दा पुन्हा सोबत येतील.

## राजुरा येथील गावठी दारूच्या अड्डयावर धाड

### 1600 लिटर सडवा मोहा नष्ट

### फ्रेजरपुरा पोलिसांची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.20 )**– राजुरा येथील पारधी बेड्यावर सुरु असणार्या गावठी दारूच्या उड्डयावर पोलिसांनी 20 ऑक्टोबर रोजी धाड टाकली. या कारवाईत 8 ड्रममध्ये ठेवलेला 1600 लिटर सडवा मोहा नष्ट करण्यात आला. ही कारवाई फ्रेजरपुरा पोलिसांनी केली.

गोपनीय माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नीलेश करे यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथक व आरसीपी प्लाटून यांनी राजुरा पारधी बेड्यावरील गावठी दारुच्या अड्डयांवर धाड टाकली. त्यावेळी पारधी बेड्यात गावराणी गावठी दारूचा मोठ्या प्रमाणात साठा दिसून आला. पोलिसांनी आरोपी सेंकनबाबू पैजन पवार (65) याच्याकडून 1200 लिटर सडवा मोहाचे 6 ड्रम, प्लास्टिकच्या दोन डब्यांमध्ये ठेवलेली गावठी दारू व इतर माल असा एकूण 52 हजार 100 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच पारधी बेड्याजवळील जलशुद्धीकरण केंद्राच्या भिंतीला लागून असलेल्या दोन ड्रममध्ये कुजलेला मोह दिसला, तो उद्धवस्त केला. ही कारवाई पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, उपायुक्त सागर पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक नीलेश करे, नीलेश गावंडे, रविद्र सहारे, शिरसाठ, ज्योती देवकते, डीबीचे सुभाष पाटील, योगेश श्रीवास, सतीश पराळे, अनिरुद्ध भीमकर, रोशन वऱ्हाडे, जयेश परिवाले तसेच महिला पोलीस अधिकारी सारिका देशमुख, प्रीती माने, तृप्ती कासदेकर, विक्की यादव, उमेश गिरोडकर यांनी केली.



### यशोदा नगरात नाकाबंदी करून वाहनांची तपासणी

19 ऑक्टोबर रोजी रात्री 9 ते 11 वाजेपर्यंत पोलीस उपनिरीक्षक ज्योती देवकते, सुनील सोळंके, सागर चव्हाण यांनी यशोदा नगर चौकात नाकाबंदी केली. यावेळी दोन वाहनांवर कारवाई करून एक हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

### अटक वॉरंटमधिल पाच जणांना अटक

पोलीस आयुक्त रेड्डी यांच्या आदेशानुसार 19 ऑक्टोबरच्या रात्री फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोम्बिंग ऑपरेशन करण्यात आले. ज्यामध्ये वॉरंटमधील पाच आरोपींना अटक करण्यात आली होती. दरम्यानच परिसरातील सर्व गुन्हेगार, हिस्ट्री शीटर्स, रेकॉर्ड तपासण्यात आले.

## आसेगाव पूर्णा येथे विज चोरीचा पर्दाफाश

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर,( दि.20 )** – महावितरण उपविभागीय कार्यालय सिटी 1 अंतर्गत येणाऱ्या आसेगाव पूर्णा वितरण केंद्रात विज चोरीचा मोठा प्रकार उघड झाला आहे. या नितीन रामकृष्ण शिरभाते यांनी विज मीटर बायपास करून अवैध विज वापर केला, ज्यामुळे महावितरण कंपनीला 1 लाख 2 हजार 34 रुपयांचा आर्थिक तोटा सहन करावा लागला आहे.

### पोलिसांत तक्रार दाखल

सहायक अभियंता महावितरण यांनी दिलेल्या माहितीनुसार, 13 मे 2024 रोजी त्यांच्या टीमने आसेगाव पूर्णा येथे पोहोचून तपासणी केली. तपासणीदरम्यान आढळले की शिरभाते यांनी विज मीटर बायपास करून अवैधपणे एलईडी बल्ब, सीसीटीव्ही, टीव्ही, कूलर, पंप आणि एसी सारख्या विद्युत उपकरणांचा वापर केला. या अवैध क्रियाकल्पात एकूण 3.815 केव्ही विज चोरी करण्यात आली होती. महावितरण टीमने घटनास्थळी पंचनामा तयार करून सर्व पुरावे, जसे की विज चोरीचे फोटो आणि विज बिल, गोळा केले. त्यानंतर पोलिस ठाण्यात महाराष्ट्र विद्युत अधिनियम 2003 च्या कलम 135 अंतर्गत तक्रार दाखल करण्यात आली आहे. महावितरणची ही कारवाई विज चोरीविरुद्ध कठोर धोरणाचा भाग आहे. उप कार्यकारी अभियंता सिटी 1 यांनी सांगितले की विज चोरांवर कडक कारवाई केली जात आहे आणि महावितरणने सर्व ग्राहकांना विनंती केली आहे की त्यांनी नियमितपणे आपल्या बिलांचे भरणा करून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

## आज मौन श्रध्दांजली

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी महोत्सव**

### वाहतुकीत एकदिवसीय बदल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.20 )** – राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा 56 वा पुण्यतिथी महोत्सव सोमवार दि. 21 ऑक्टोबर 2024 रोजी मोझरी येथील गुरुदेव नगर येथे साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त दरवर्षीप्रमाणे मौन श्रध्दांजली वाहण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी सुमारे एक ते दीड लाख भक्तगण समाधीस्थळी जमतात. या कार्यक्रमादरम्यान होणारी गर्दी पाहता कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहावरील वाहतुक व्यवस्थेत एकदिवसीय बदल करण्यात आला आहे. यानुसार अमरावतीकडून तिवसा तालुक्यातील मोझरी – गुरुदेव नगर मार्गे नागपूरकडे जाणारी वाहतूक (एसटी बसेस, रुग्णवाहिका व अग्निशमन वाहन वगळून) नांदगाव पेठ पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतून मोर्शीमार्गे नागपूरकडे वळविण्यात येत आहे.



नागपूर कडून अमरावतीकडे येणारी वाहतूक (एसटी बसेस, रुग्णवाहिका व अग्निशमन वाहन वगळून) तिवसा शहरातील पंचवटी चौकातून कुऱ्हा मार्गे अमरावतीकडे वळविण्यात येत आहे. ही वाहतूक व्यवस्था दि. 21 ऑक्टोबर रोजी दुपारी 12 ते सायंकाळी 6 वाजेपर्यंत वरील मार्गाने वळविण्यात येत आहे. या अधिसूचनेचे उल्लंघन करणाऱ्या विरुध्द मोटार वाहन कायदा व मुंबई पोलीस कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाअधिकारी सौरभ कटियार यांनी केले आहे.

## अचलपूर मतदार संघात तिरंगी लढतीचे चित्र

### भाजपकडून प्रवीण तायडे यांना उमेदवारी जाहीर

### इच्छुकांच्या आशा मावळल्या



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.20 )** – भारतीय जनता पक्षाने रविवार (20 ऑक्टोबर) रोजी अचलपूर मतदार संघात माजी जिल्हा परिषद सदस्य प्रवीण तायडे यांना उमेदवारी जाहीर केल्याने, अचलपूर मतदार संघात तिरंगी लढतीचे चित्र दिसत आहे. दुसरीकडे भाजपकडून उमेदवारी मिळण्याकरिता रांगेत असलेल्या अनेक इच्छुकांच्या आशा मावळल्या आहे. त्यामूळे भाजपमध्ये बंडखोरी होते की, काय असे चिन्ह दिसत आहे.

गेल्या 20 वर्षापासून अचलपूर मतदार संघ हा प्रहास संघटनेचे संस्थापक तथा अपक्ष आमदार बच्चू कडू यांच्या ताब्यात आहे. दुसरीकडे माजी खासदार नवनित राणा या पराभवाचा बदला घेण्याकरिता तयारीला लागल्या आहे. भारतीय जनता पक्षाकडून आता प्रवीण तायडे यांना विधानसभेची उमेदवारी मिळाल्याने 'पाटील' मतांचे विभाजन होण्याची भीती आहे. दुसरीकडे कॉँग्रेसकडून अनिरुध्द उर्फ बबलु देशमुखही मैदानात राहत असल्याने विद्यमान आ.बच्चु कडूंकरिता यंदाची निवडणूक कठीण होणार असल्याचे चिन्ह दिसत आहे.

### जातीय समीकरणे जुळविले

अचलपूर मतदार संघात विनायकराव कोरडे, अशोकराव बन्सोड यांच्यानंतर तिसऱ्यांदा प्रवीण तायडे यांना कमळ चिन्ह मिळाले आहे. त्यामुळे पारंपारिक हा मतदारसंघ माळी समाजातील उमेदवार दिला जाईल, अशी चर्चा होती. मात्र माळी समाजातील प्रमोद कोरडे यांनी बियाणे महामंडळ वर नियुक्त केल्याने आता हा मतदारसंघ प्रवीण तायडे यांना मिळाला आहे. राजकीय समीकरण बरोबर जाती समीकरण यांचा अभ्यास करून भाजपने ही उमेदवारी जाहीर केली असल्याचे बोलले जात आहे.

### भाजपात अंतर्गत वादाची ठिणगी

लोकसभा निवडणूकीत नवनित राणा यांचा प्रचार करत असताना प्रवीण तायडे यांनी आमदार बच्चू कडूं यांच्याविरोधात आक्रमक पवित्रा घेतला होता. तसेच आमदार बच्चू कडू यांच्या विरोधात त्यांनी अनेक आंदोलन देखील केली. त्या आंदोलनाचा फायदा त्यांना आता होताना दिसत आहे. दुसरीकडे लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर स्थानिक भाजप पदाधिकारी आणि प्रवीण तायडे यांच्यामध्ये वादाची ठिणगीही पडली होती. त्या वादाचा परिणामही या निवडणूकीमध्ये पहायला मिळणार. प्रवीण तायडे हे असतपुर जिल्हा परिषद सर्कल मधून जिल्हा परिषद सदस्य असताना गटनेता म्हणून त्यांनी अमरावती जिल्हा परिषद मध्ये काम पाहिले आहे.

## पहाटे गावागावात उमटतात काकडा आरतीचे सुर

**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट,** ( दि.20 )– आश्विन–कार्तिक महिना सुरु झाला की, थंडीची चाहूल लागते त्यासोबतच पहाटे गावोगावी काकड आरतीचे सूर ऐकू येतात. कार्तिक महिन्यांमध्ये काकड आरती होते. काही मंदिरांमध्ये रोज पहाटे काकड आरती केली जाते.



हिंदू धर्मामध्ये सकाळच्या वेळी देवाला जागवण्यासाठी करण्यात येणाऱ्या आरतीला काकड आरती असे म्हणतात. काही गावांमध्ये आश्विन–कार्तिक महिन्यात काकड आरती करण्यात येते. कार्तिक एकादशीपासून त्रिपुरारी पौर्णिमेपर्यंत गावोगावी काकड आरती करण्यात येते. हिंदू धर्मामध्ये सकाळच्या वेळी देवाला जागवण्यासाठी करण्यात येणाऱ्या आरतीला काकड आरती असे म्हणतात. काही मंदिराची काकड आरती ही नित्य परंपरा असली तरी विदर्भातील काही गावांमध्ये आश्विन–कार्तिक महिन्यात काकड आरती करण्यात येते. कार्तिक एकादशीपासून त्रिपुरारी पौर्णिमेपर्यंत गावोगावी काकड आरती करण्यात येते. प्रात:काळी देवाचे नामस्मरण करावे, दिवसाची प्रसन्न सुरुवात करावी, सर्व गावाने एकत्र यावे, असे यामागचे उद्देश आहे. आश्विन–कार्तिक महिन्यांमध्ये पाऊस थांबलेला असतो, हलकी थंडी पडायला सुरुवात झालेली असते. कार्तिकी एकादशीला चातुर्मास संपतो, त्यानंतर मंदिरांमध्ये उत्सवांना सुरुवात होते. एकूणच धार्मिक वातावरण असते. सामाजिक आणि सांस्कृतिक अंगांनी या काळात काकड आरतीला महत्त्व प्राप्त होते.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक –श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# मतदार यादीतील नावे वगळून बाहेरची 10 हजार नावे यादीत

## महाविकास आघाडीचा धक्कादायक आरोप ■ धामणगाव रेल्वे मतदारसंघातही घोळ?

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे,( दि.20 )-** महाराष्ट्रातील मतदारांची नावे वगळून छत्तीसगड, मध्य प्रदेशसह बाहेरच्या राज्यातील मतदारांची नावे त्यामध्ये टाकून दहा हजार नावे त्यामध्ये जोडली जात आहेत. हे भाजपचे कारस्थान असून त्यात राज्यातील काही अधिकारी सहभागी असल्याचा आरोप, महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून शनिवारी (ता. 19) करण्यात आला. महाविकास आघाडीच्या मुंबई येथील बैठकीदरम्यान शिवसेना नेते (ठाकरे गट) संजय राऊत आणि काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी संयुक्तरीत्या पत्रकारांशी बोलतांना मतदारसंघातून मतदारांची नावे वगळली जात असल्याचा आरोप केला. या घोळमध्ये अमरावती



जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे मतदारसंघाचाही समावेश असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

देशातील निवडणुका निष्पक्ष घेण्याचा अधिकार संविधानाने दिलेला आहे. मात्र, त्या अधिकाराचे उल्लंघन सुरू आहे. निवडणुकीमध्ये आपण विजयी होऊ शकत नाही, आपण सत्ता गमावत आहोत, या भीतीने भाजपा नेते यांनी हे मोठे कारस्थान लोकशाही विरोधात रचले. काही मतदारसंघ त्यांनी ठरवलेले आहेत. त्यासाठी विशेष ॲपची निर्मिती करून प्रत्येक मतदारसंघात किमान 10 हजार मते त्यामधून काढून टाकायची आणि तेवढी मते त्या ठिकाणी बाहेरील राज्यातील टाकण्याचे कारस्थान समोर आलेलं आहे असा आरोप करण्यात आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते, आमदार जितेंद्र आव्हाड यांनी प्रसारमाध्यमांना दिलेल्या प्रतिक्रियेत धामणगाव रेल्वे सह महाराष्ट्रातील इतर 12 मतदारसंघांतील नावे वगळण्यात आल्याचा आरोप केला आहे. या घोळमध्ये धामणगाव मतदारसंघाचेही नाव आल्याने चांदूर रेल्वे, धामणगाव, नांदगाव खंडेश्वर या तीनही तालुक्यात याविषयीच्या चर्चांना उधान आले आहे. त्यामुळे आता स्थानिक निवडणुक अधिकारी यावर काय निर्णय घेतात हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

### निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे तक्रार - प्रा. वीरेंद्र जगताप



आ. जितेंद्र आव्हाड यांनी सांगितलेली माहिती तपासून पाहिली असता ती खरी आहे. भाजप निवडणूक जिंकण्यासाठी सर्वस्तरावरून प्रयत्न करीत आहे. त्याचाच भाग म्हणून काहींची खोटे आधार कार्ड करून ऑनलाईन पद्धतीने नवे नाव ?ड करीत असल्याची माहिती आम्हाला भेटली आहे. त्या विरोधात आम्ही निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे तक्रार केली असून त्या प्रक्रियेअवर आम्ही लक्ष ठेवून आहो. मतदारांचा संवैधानिक मतदान करण्याचा अधिकार जर असे कोणी थांबवत असेल तर आम्ही ते खपवून घेणार नाही.

**प्रा.विरेंद्र जगताप,**
**माजी आमदार ( काँग्रेस ), धामणगाव विधानसभा मतदारसंघ.**

# आधी आरोप, नंतर दिलगिरीचे पत्र?

## खरेदी विक्री संस्थेची मवाळ भूमिका

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार,( दि.20 )-** खरेदी विक्री संस्था आणि कृषी उत्पन्न बाजार समिती या दोन संस्थामध्ये यावर्षी नाफेड खरेदी सुरू करण्यासाठी अंतर्गत समन्वय नसल्यामुळे आचारसंहितेच्या काळात त्यांच्यातील वाद हा चव्हाट्यावर आला. खरेदी-विक्री कडून नाफेड च्या खरेदीच्या व्यवहारासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीला शेड उपलब्ध करण्याच्या मागणीचे पत्र पाठवले. त्या पत्राच्या आधारे बाजार समितीने सोयाबीनचे आवक जास्त असल्याने शेड उपलब्ध नसल्याचे पत्र खरेदी विक्रीला पाठवले होते. त्यावर खरेदी-विक्री कडुन प्रेस नोट देत असे सांगण्यात आले की कृषी उत्पन्न बाजार समितीची शेतकरी विरोधी भूमिका आहे. त्या संदर्भात अनेक वृत्तपत्रात बातमी देखील प्रकाशित झाल्या. बातम्या प्रकाशित झाल्यानंतर बाजार समितीकडून या संदर्भात पत्रकार परिषद करून घेऊन वस्तूस्थिती सांगण्यात आली. आता मात्र खरेदी-विक्री संस्थेने मवाळ भूमिका स्विकारत दिलगिरीचे पत्र कृषी उत्पन्न बाजार समितीला दिले आहे.



पुन्हा बाजार समिती ला स्मरण पत्र दिले आहे. सहायक निबंधक देखील त्या ठिकाणी आले होते. पुन्हा शेड आणि ओटे देण्याची मागणी करण्यात आली आहे.

**अशोक सिनकर,**
**खरेदी-विक्री संस्था,सचिव, चांदूर बाजार.**

आमची शेतकरी विरोधी भूमिका कधीच नाही. मात्र जागा उपलब्ध नसल्याने जागा देण्यात आली नाही. त्यांनी दिलगिरी व्यक्त करत परत जागा मागणीची विनंती केली आहे. त्यानुसार त्यांना टीएमसी यार्ड मधील जागा उपलब्ध करून दिली जाईल.

**मनीष भारंबे,**
**सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती, चांदूर बाजार.**

### काय आहे पत्रात

गोडातुन, शेड व ओटे यामध्ये बराच फरक आहे. शेतामालाचे मोजमाप. काटा इत्यादी गोडावुन मध्ये होऊ शकत नाही. त्या करीता शेड व ओटे यांचीच आवश्यकता असते. शेड ओटे चारही बाजूने ते मोकळे व हवेशीर असतात. सर्वच खरेदी-विक्री जवळ गोडावुन आहे. तरी सुध्दा त्या तालुक्याच्या बाजार समिती मध्येच काटा व मोजमाप करण्यात येते, गोडावुनचा वापर फक्त साठवनुकीसाठीच केला जातो. त्यामुळे मागील वर्षी जे शेड दिले होते. ते यावर्षी सुद्धा देण्यात यावे, अशी मागणी करत बाजार समिती ची बदनामी करण्याचा कोणातच उद्देश नसल्याचे सांगत सचिवांनी दिलगिरी व्यक्त केली.

# कंत्राटी कामगारांच्या जीवाची काळजी घेणार तरी कोण?

## आवश्यक साधन सामुग्रीचा अभाव



**महासागर प्रतिनिधी**
**वरुड,( दि.20 ) -** तिन्ही ऋतुमध्ये जीवाची पर्वा न करता अविरत काम करणाऱ्या कंत्राटी वीज कामगारांच्या जीवाची कोण घेणार? असा प्रश्न निर्माण झाला आहे. आवश्यक साधन सामुग्रीचा अभाव असतानाही या कामगारांना आपला जीव धोक्यात टाकून कामे करावी लागते.

एखाद्या भागाचा वीज पुरवठा खंडीत झाल्यानंतर महावितरण कर्मचाऱ्यांकडून तातडीने देखभाल दुरुस्तीचे कामे हाती घेतले जाते. वारा, पाऊस, उन, हिवाळा कशाचीही तमा न बाळगता बहुतांश कंत्राटी वीज कामगार वीज पुरवठा पुर्ववत करण्याकरिता झुंजत असतात. अशावेळी एखादी दुर्दैवी घटना घडल्यास कर्मचाऱ्यांना जीवाला मुकावे लागतात ही वस्तुस्थिती आहे, म्हणून कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाचा विचार करून शासनाने त्यांना पाहिजे ते साधन सामुग्री पुरवावी अशी मागणी यानिमित्ताने होऊ लागली आहे. आता शासन या कर्मचाऱ्यांची काळजी घेणार का? त्यांना आवश्यक असलेले संपूर्ण साहित्य मिळणार का? असे एक ना अनेक प्रश्न उपस्थित केल्या जात आहे.

### अशी सुरक्षेची साधने

कर्मचाऱ्यांना रबरी हात मोजे, टूलकिट, त्यात पक्कड टेस्टर, स्क्रू ड्रायव्हरसह, झुला, ऑपरेटरला हेल्मेट, रात्रीच्या वेळी काम करणाऱ्या कर्मचाऱ्याला बॅटरी, दोन बूट, शिडी आणि महावितरणाच्या कर्मचाऱ्यांना दोन ड्रेस दिले जावे देणे अत्यंत गरजेचे आहे.

## राज्यस्तर नेटबॉल क्रीडा स्पर्धेचे मंगळवारी उद्घाटन

**अमरावती-** राज्यस्तर शालेय नेटबॉल क्रीडा स्पर्धा दि. 22 आणि 23 ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आल्या आहे. या स्पर्धेचे उद्घाटन विभागीय क्रीडा संकुलात मंगळवार, दि. 22 ऑक्टोबर रोजी सायंकाळी पाच वाजता करण्यात येणार आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे, क्रीडा व युवक सेवा उपसंचालक अमरावती विभाग, जिल्हा क्रीडा परिषद आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र ॲमेच्युअर नेटबॉल असोसिएशनतर्फे स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

# सोयाबीन भिजले, कपासी झोपली, संत्र्याला गळती

■ आ.यशोमती ठाकूरकडून पाहणी

■ मदतीची मागणी



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.20 )-** जिल्ह्यात शनिवारी बरसलेल्या अवकाळी वादळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या हाती आलेल्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

अवकाळी शेतकऱ्यांनी शेतात काढून ठेवलेल्या सोयाबीनच्या गंज्या पावसात भिजल्या, सोसाट्याच्या वाऱ्यासह धो-धो बरसलेल्या पावसात उभे कपाशी पीक झोपून शेतात आडवी झाली. संत्रा पिकालाही याचा मोठा फटका बसला असून अर्धा अधिक संत्रा गळून खराब झाला आहे. ऐन दिवाळीच्या तोंडावर शेतकऱ्यांवर ओढावलेल्या या आकस्मिक संकटाने शेतकरी हवालदिल झाला असून हाती आलेले पीक वाया गेल्याने याचा मोठा आर्थिक फटका शेतकऱ्यांना बसला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी तात्काळ भरीव आर्थिक मदतीची मागणी माजी मंत्री आमदार ॲड. यशोमती ठाकूर यांनी केली. तिवसा तालुक्यात झालेल्या नुकसानीची पाहणी करताना त्यांनी शेतकऱ्यांच्याशी संवाद साधून झालेल्या नुकसानाचा आढावा घेतला. पिकांची पाहणी करताना शेतात आडवे पडलेले कपाशी पीक बघून शेतकऱ्यांचे झालेले नुकसान मोठे असल्याने त्यांना मदत पुरविण्यात आचारसंहितेची आडकाठी आणल्या जाऊ नये ही अपेक्षा यशोमती ठाकूर यांनी व्यक्त केली.

शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे झालेल्या नुकसानाचे तात्काळ पंचनामे करण्यात यावेत, घरांची पडझड, मोझरी येथे झालेला वीज पडून मृत्यू इत्यादी नुकसानीची मदत तात्काळ द्यावी हि मागणी यशोमती ठाकूर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना केली.

# विल हैरीस यांचे कार्य युवकांसाठी प्रेरणादायी -डॉ नितीन धांडे



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.20 ) -** प्रा.राम मेघे कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड मॅनेजमेंट बडनेराच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकाद्वारे दि.18 ऑक्टोंबर रोजी महाविद्यालयामध्ये व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमासाठी विल हॅरिस व त्यांचे सहकारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमामध्ये व्यक्तिमत्व विकासाचे विविध पैलू न वर प्रकाश टाकण्यात आला.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ नितीन धांडे यांनी विल हैरीस यांचे स्वागत केले. विल हर्रीस यांचे कार्य फार मोठे व प्रेरणादायी असल्याचे त्यांनी म्हटले व युवकांनी त्यांच्या कडुन प्रेरणा घ्यावी असे आवाहन देखील केले. विल हैरीस यांनी छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद व संत तुकडोजी महाराज यांच्या विचारांची आजच्या जीवन पद्धतीसोबत सांगड घालून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महापुरुषांच्या व्यक्तिमत्वाचा अभ्यास केल्यास आपले जीवन कसे सोयीस्कर होईल, याकडे प्रामुख्याने लक्ष वेधले. कार्यक्रमादरम्यान तानिया डायमंड, कोरीना स्तोफेल व सर्गियो ग्याझीयानो यांनी सुद्धा भाषेचे महत्व, आत्मविश्वासाची गरज व कामाप्रतीचा हेतू या विविध विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.जी.हरकुट होते, प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ.ए.व्ही.कडू, विल पावर फाउंडेशनचे कोफाउंडर शुभम नागपुरे, केसिया क्लीटोस, इलायाना फर्नांडीस, टीना कुपरस्मिथ, स्तेफिनी एडरसन, ऐस्टार येले, सर्जिओ गाझीयानो होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो चे कार्यक्रम अधिकारी प्रा.शुभम कदम यांनी केले.



# मनसेची निवडणूक आढावा बैठक

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.20 ) -** विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पप्पू पाटील उर्फ मंगेश पाटील यांची शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थित 17 ऑक्टोबर रोजी ॲनिमेशन कॉलेज अमरावती येथे शेकडो कार्यकर्त्याच्या उपस्थितीत नियोजन आढावा बैठक पार पडली.

या बैठकीला शहरातील मनसेचे शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. विशेष म्हणजे मागील महिन्यात राज ठाकरे यांनी निवडणुकीच्या निमित्ताने पदाधिकाऱ्यांशी संवाद साधण्याकरता अमरावती येथे भेट दिली असल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला आहे. सध्या राजकीय विचित्र परिस्थितीमुळे कंटाळलेली जनता दिशाहीन व संभ्रमित अवस्थेत आहे. या बैठकीमध्ये कार्यकर्त्यांनी आम्ही राज ठाकरे यांच्या विचाराचे पाईक आहोत, समाजाला नवीन विचार व शहराला नवीन दिशा देण्याचा विचार प्रसारीत करू, व जोमाने काम करू असे आश्वासन विधानसभा अमरावतीचे मनसेचे उमेदवार पप्पू पाटील उर्फ मंगेश पाटील यांना नियोजन आढावा बैठकीत दिले.


# वरुड तालुक्यात मुरूमाचे मोठ्याप्रमाणात उत्खनन

## महसुल विभाग अनभिज्ञ

**महासागर प्रतिनिधी**
**वरूड, ( दि.20 )-** तालुक्यातंर्गत सातपुडा लगतच्या पायथ्याशी असलेल्या गव्हाणकुंड, भेमडी परीसरातुन मुरूमाचे मोठ्याप्रमाणात अवैध उत्खनन होत आहे. या मुरूमाची बाजारात खुलेआम चढ्या दराने विक्री होत असुन सुध्दा महसुल विभाग अनभिज्ञ आहे.

काही वर्षापुर्वी तालुक्यात धरणे बांधलेली आहे, त्यामध्ये शेकदरी धरणातुन व भेमडी परीसरातुन मोठ्याप्रमाणात ट्रॅक्टरद्वारे मुरूमाचे उत्खनन सुरू आहे. या मुरुमातून शहरात तसेच ग्रामिण भागात शासकिय तसेच वैयक्तीक कामे मोठ्याप्रमाणात केली जात आहे. यावर कुणीच कारवाई करित नाही. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांचे हात ओले झाले असावे अशी नागरीकांमध्ये चर्चा आहे.

अवैध गौण खनिज उत्खनाला आळा घालण्याची जबाबदारी त्या-त्या भागातील तलाठी व तहसीलदार यांच्यासह जिल्ह्यातील महसुल प्रशासनाचे आहे. दिवसाढवळ्या होत असलेल्या या अवैध मुरूमाचे उत्खनाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा परीसरातील नागरीकांकडुन होत आहे. तालुक्यात सुरू असलेल्या शासकिय व वैयक्तीक कामात मोठ्याप्रमाणात मुरूमाचा उपयोग केल्या जातो. मुरूमाचे उत्खननाकरीता तहसील कार्यालयाकडुन रॉयल्टी भरून परवानगी घेतल्या जाते व त्या रॉयल्टी नुसारच उत्खनन करावे लागते. परंतु अधिकाऱ्यांच्या डोळ्यात धुळफेक करुन शेकडो ब्रॉस मुरूमाचे सर्रास उत्खनन होत आहे. या उत्खननामुळे मोठ-मोठ्या टेकड्या उध्वस्त होत आहे. तसेच शासनाचा लाखो रूपयाचा महसुल सुध्दा बुडत आहे. याविषयी उपविभागीय अधिकारी यांनी लक्ष घालुन अवैध गौण खनिज माफीयांना आवर घालावा अशी मागणी होत आहे. विशेष म्हणजे यामध्ये स्थानिक आमदारांनीही चुप्पी साधली आहे, हे विशेष.



### महसुल विभागाने करावी चौकशी

वरूड तालुक्यात मोठ्या प्रमाणात शासकिय व अशासकिय बांधकामे सुरू आहे. या बांधकामावर मोठ्याप्रमाणात अवैध गौण खनिज वापरण्यात येत आहे. मात्र याकडे कुणाचेच लक्ष नाही. काही ठिकाणी एका ब्रॉस मुरूमाची परवाणगी काढुन शेकडो ब्रास मुरूम वापरल्या जात आहे. 2000 फुट बांधकामाकरीता 50 ब्रास मुरूम लागतो. 50 हजार रूपये होते. अवैध मुरुम उत्खनन करुन ट्रक मालक लाखो रुपयांची काळी माया जमवित आहे, सुरु असलेला बांधकामांची महसुल विभागाने योग्य चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याची मागणी नागरिक करित आहेत.

# सणासुदीत डाळी व कडधान्यांच्या भावात वाढ

**महासागर प्रतिनिधी**
**पथ्रोट, ( दि.20 )-** 'दिवाळी सण मोठा, नाही आनंदाला तोटा' असं म्हटलं जातं. दसऱ्यानंतर दिवाळी सण साजरा करण्यासाठी सर्व उत्सुक असतात. दिवाळी सणात नवीन कपडे, घरी आनंदाचे वातावरण, आणि गोडधोड फराळ बनविला जातो. हा गोड फराळ खाण्यासाठी खवय्ये वर्षभर दिवाळीची वाट पाहत असतात. तसेच पंधरा ते आठवडाभर आधीच फराळ बनविण्यासाठी गृहिणींचे लगबग सुरु असते. मात्र या वर्षी फराळ बनविणाऱ्या गृहिणींचे बजेट कोलमडणार असून, दिवाळीत फराळ तयार करायचा की नाही, असा प्रश्न गृहिणींना पडला आहे.



सणासुदीच्या व दिवाळीच्या तोंडावर फराळ बनविण्यासाठी जे जिन्नस लागतात. ते म्हणजे डाळी, साखर व कडधान्य यांच्या किंमतीत वाढ झाल्यामुळं याची झळ सामान्य लोकांना बसत आहे. त्यामुळं दिवाळी कशी साजरी करायची असा प्रश्न गृहिणी व सामान्य लोकांसमोर आहे.

आधीच एवढी महागाई वाढली आहे, आणि आता दिवाळीसारख्या सणांच्या तोंडावर डाळी, साखर व कडधान्याच्या किंमतीत वाढ झाल्यामुळं खर्चाचे गणित जुळवणे कठीण होत आहे. या दरवाढीची झळ एवढी बसत आहे की, सर्वसामान्यांनी दिवाळी साजरी करायची की नाही? असा सवाल गुहिणीनी उपस्थित केला आहे. जसा पुरवठा कमी झाला आणि मागणी वाढली की, त्याचा थेट परिणाम किंमतीवर होतो, असं समीकरण आहे. उत्पादन कमी झाले आहे. परिणामी आवक कमी होत आहे, त्यामुळं किंमतीत 10 ते 15 रुपयांनी वाढ झाली आहे. दुष्काळ व उत्पादनात घट झाल्याने साखर, डाळी व कडधान्यांच्या दरात वाढ झाल्याचे विक्रेते यांनी सांगितलं.

### साखर झाली कडू

मागील वर्षापेक्षा या वर्षी कडधान्य व डाळींच्या किंमतीत 10 ते 15 रुपयांनी वाढ झाल्याचं चित्र आहे. मागील वर्षी 54 ते 65 रुपये किलो दराने हरभरा विकला जात होता. या वर्षी हेच दर 60 ते 75 रुपयांवर पोहोचले आहेत. मूग 81 ते 110 वरून 100 ते 125 रुपयांवर, उडीद 82 ते 90 वरून 95 ते 120 रुपयांवर पोहोचला आहेत. तसेच फराळ बनविण्यास महत्त्वाचा घटक व जिन्नस म्हणजे साखर. फराळाला मोठ्याप्रमाणात साखरेचा उपयोग होतो. परंतू महागाईमूळे सणासुदीच्या काळात साखर कडू झाली आहे. याशिवाय कडधान्यांच्या किंमतीत तेजी आली आहे. यामुळं ऐन सणासुदीच्या काळात डाळी, साखर व कडधान्यांचा किंमती वाढल्यामुळं गृहिणींनी नाराजी व्यक्त केली आहे.